ातारा TODAY

**सहकारी संस्था**

| | |
|---|---|
| पंचायत समित्या- | ११ |
| नगरपालिका- | ८ |
| नगरपंचायत- | १ |
| जिल्हा परिषद- | १ |

**गुड मॉर्निंग एसएमएस**

A warm hello doesn't come from the lips,It comes from the heart,Doesn't have to be told,It has to be shown,Doesn't have to be given,It has to be sent.Good Morning.

# 'फॉरेस्ट'च्या आडकाठीने भांबवलीची बिकट वाट!

सकाळ वृत्तसेवा

सातारा, ता. ७ : घरात अडलेली महिला किंवा आजारी वृद्ध असेल, तर कुटुंबीयांसह संपूर्ण गावाच्या अंगावर काटा उभा राहतो. पैसा- अडका, गाडी- घोडा असून, केवळ रस्त्याची सुविधा नसल्याने या लोकांना तातडीने उपचार देता येत नाहीत. कोणत्या आदिवासी जिल्ह्यातील ही गोष्ट सांगत नाहीये; साताऱ्यापासून अवघ्या २५ किलोमीटरवर असलेल्या कासजवळच्या भांबवली गावातील हे वास्तव आहे. वन खात्याच्या आडमुठेपणामुळे तांबी ते भांबवली हा रस्ता वर्षानुवर्षे रखडला आहे.

साताऱ्यापासून बोमणोलीकडे जाताना २५ किलोमीटरवर कास आहे. तेथून डोंगरात डाव्याबाजूला रस्त्याचा फुटलेला फाटा तांबी गावात नेतो. तांबीपासून डोंगर उतरत सुमारे दोन किलोमीटरची पायपीट केल्यानंतर भांबवली गावी जाता येते. येथील ग्रामस्थांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. रस्त्याचा प्रश्न प्रलंबित आहे. नियमांचा बागुलबुवा उभा करून रस्ता अडवला गेला आहे. कासपासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात रस्त्याअभावी साधी सायकलही जाऊ शकत नाही, इतकी वाईट परिस्थिती आहे. मग चारचाकी वाहन कसे पोचणार असा प्रश्न आहे. रात्री- अपरात्री आरोग्याची गंभीर तक्रार उद्‌भवल्यास जिवाला मुकावे लागते. असे प्रसंगी वरच्यावर गावात घडत आहेत.

## नियमांचा बागुलबुवा नको

**तांबी- भांबवली रस्ता झाल्यास भांबवलीसह धावली, अलवडी या गावांचीही सोय होणार आहे. या रस्त्यासाठी भांबवली ग्रामस्थ स्वतःची जमीन देण्यास तयार आहेत. वन विभागाने नको तिथे नियमांचे घोडे दामटवण्यापेक्षा 'प्रॅक्टिकल' विचार करून डोंगरी भागात राहणाऱ्या ग्रामस्थांचे जीवन सुखकर होण्यासाठी निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**

### एक ना अनेक अडचणी

भांबवली गावात केळीच्या बागा आहेत. रस्त्याअभावी या लोकांना वाहतुकीची मोठी अडचण होते. गरोदर स्त्रिया, आजारी वृद्ध व्यक्ती यांना उंच डोंगर चढून जाणे किंवा उतरणे जिकिरीचे होते. डोली करून रुग्णांना गाडीच्या ठिकाणापर्यंत न्यावे लागते. या गावातील बहुतांश युवक व तरुण नोकरी, रोजगारासाठी शहरात राहत असल्याने गावात डोली उचलून नेण्यासाठी कोणी मिळत नाही. त्यामुळे गेल्या काही वर्षांत काहींना उपचाराअभावी मृत्यूला कवटळावे लागले आहे.

### उपचाराअभावी मृत्यू

काही महिन्यांपूर्वी हृदयविकाराचा झटका आलेल्या एका वृद्धाचा उपचाराअभावी गावातच मृत्यू झाला. वाहनाची सोय नसल्याने गावातील विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे.

तांबी ते भांबवली या सुमारे अडीच किलोमीटरच्या रस्त्यासाठी ग्रामस्थ स्वतःची जमीन देण्यास तयार आहेत. प्रश्न आहे वनखात्याच्या जागेतून जाणाऱ्या अवघ्या ६०० मीटर जागेचा! ही परवानगी वन विभाग देत नाही. रस्त्याची मागणी करत एक पिढी संपली. मात्र, रस्त्याचे स्वप्न अपुरे राहिले आहे.

## 'रस्त्या'च्या अडचणी

- वाहतुकीची मोठी अडचण
- उपचारासाठी डोलीतून प्रवास
- मुलांच्या शिक्षणात अडचणी
- जगाशी संपर्क कमी



भांबवली (ता. सातारा) : रस्त्याची सोय नसल्याने ग्रामस्थांना वृद्ध व रुग्णांना डोलीत बसवून डोंगरकड्याव सुमारे दोन किलोमीटर अंतर पार करावे लागते.